दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक




vadalvartanews@gmail.com संपादक : अजय भांगे https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | रविवार दि.२२ मार्च २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २०४ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Sunday 22 March 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 204 | Pages 4 | Rate 4 Rs

# इराणप्रश्नी भारताने ठाम भूमिका घ्यायला हवी होती-राज ठाकरे

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

इराणने दीर्घकाळ भारताला साथ दिली. आता त्या देशावर हल्ले होत असताना भारतानेही ठामपणे पाठिंबा द्यायला हवा होता. इराणकडून भारताला रुपयांमध्ये तेल मिळते, जम्मू-काश्मीरच्या मुद्द्यावरही त्या देशाने भारताला पाठिंबा दिला होता; मात्र अडचणीच्या काळात भारताने स्पष्ट भूमिका घेतली नाही, याचे परिणाम भविष्यात भोगावे लागतील असे मत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी गुरुवारी व्यक्त केले.दादर येथील शिवाजी पार्क मैदानात आयोजित मनसेच्या गुढीपाडवा मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी बाळा नांदगावकर, संदीप देशपांडे यांच्यासह मनसेचे पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते. राज ठाकरे म्हणाले, देशात नेमके काय सुरू आहे याचीच लोकांना जाणीव राहिलेली नाही. समाज माध्यमांमध्ये आणि करमणुकीत लोकांना गुंतवून ठेवले जात आहे. 'मी काय बोलतो यापेक्षा तुम्ही त्यातून काय घेतात हे महत्त्वाचे आहे,' असे सांगत त्यांनी कार्यकर्त्यांना सोशल मीडियाच्या प्रभावातून बाहेर पडण्याचे आवाहन केले.निवडणुका येत-जात राहतात. मात्र आपण महाराष्ट्राच्या पुनरुत्थानासाठी उभे आहोत, असे स्पष्ट करत ठाकरे यांनी 'महाराष्ट्राचे हरवलेले वैभव परत मिळवण्यासाठी सत्ता आपल्या हाती घेणारच,' असा निर्धार यावेळी व्यक्त केला. राज्याच्या आर्थिक स्थितीवर भाष्य करताना त्यांनी सांगितले की, महाराष्ट्रावर सध्या सुमारे ११ लाख कोटींचे कर्ज आहे. पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री असताना हे कर्ज सुमारे २ लाख कोटी होते; त्यानंतर सत्तांतर झाले आणि आजची स्थिती समोर आहे. शहरांतील वाहतूक कोंडी, खराब रस्ते आणि नागरी सुविधांची ढासळलेली अवस्था कधी सुधारणार सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारू नयेत म्हणून समाजाला मोबाइल आणि करमणुकीत गुंतवले जाते. माध्यमांनाही दबावाखाली ठेवले जाते, असा आरोप देखील राज ठाकरे यांनी केला.महाराष्ट्राच्या विकासासाठी नागरिकांच्या कल्पना आणि सूचनांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी 'महाराष्ट्र नेक्स्ट' ही नवी वेबसाइट सुरू



करत असल्याची घोषणा राज ठाकरे यांनी यावेळी केली. सरकारवर पूर्णपणे अवलंबून राहून चालणार नाही; महाराष्ट्र घडवण्यासाठी प्रत्येकाने पुढे यायला हवे, असे आवाहन त्यांनी केले.एकेकाळी संपूर्ण देशाचे लक्ष महाराष्ट्राकडे असायचे. मात्र आज महाराष्ट्र काय देतोय, हा प्रश्न निर्माण झाला आहे. क्रिकेटसारख्या क्षेत्रातही मुंबईचे प्रतिनिधित्व कमी होत आहे. आपण कुठे कमी पडतोय, याचा विचारच होत नाही. महाराष्ट्र कसा घडवायचा याचा विचार आपणच करायला हवा. सरकार आपल्या डोक्यावर बसले आहे आणि आपल्याला काही देणे-घेणे उरलेले नाही, अशी स्थिती झाली आहे.२००६ साली जाहीर केलेल्या 'ब्लूप्रिंट'च्या संदर्भाचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, काळानुसार राज्यात मोठे बदल झाले आहेत. वर्तमानपत्रांत अनेक चांगले लेख आणि कल्पना येतात; मात्र त्यांना योग्य व्यासपीठ मिळत नाही. अनेकांकडे योजना आहेत, पण ऐकणारे कोणी नाही।. याच पार्श्वभूमीवर 'महाराष्ट्र नेक्स्ट' हा मंच उभारण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या वेबसाइटवर नागरिकांनी आपले विचार मांडावेत. 'जय महाराष्ट्र'सारख्या घोषणांना नव्हे, तर ठोस कल्पनांना येथे स्थान असेल, असे त्यांनी नमूद केले.ही वेबसाइट नागरिक आणि सरकार यांच्यातील दुवा म्हणून काम करेल, असे सांगत ठाकरे म्हणाले, तुम्ही सुचवलेली योग्य कामे सरकारकडून करून घेण्यासाठी आम्ही प्रयत्न करू. तसेच, सूचना देणाऱ्या नागरिकांची गोपनीयता राखली जाईल आणि त्यांच्या नाव-नंबरची माहिती उघड केली जाणार नाही, अशी हमीही त्यांनी दिली.राज्यात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या होत असल्याचा मुद्दा उपस्थित करत त्यांनी सांगितले की, तीन वेळा कर्जमाफी होऊनही परिस्थितीत बदल झालेला नाही. ग्रामीण भागातील तरुण शेती सोडून शहरांकडे वळत आहेत; मात्र शहरांचीही अवस्था बिकट असल्याचे त्यांनी नमूद केले. एनसीआरबीच्या आकडेवारीनुसार दरवर्षी ४ हजार ५०० ते ५ हजार मुले बेपत्ता होतात. तरुण पिढी व्यसनाधीन होत आहे, ड्रग्सचा प्रसार वाढत आहे, अशी चिंताही त्यांनी व्यक्त केली.

## ध्येय एज्युकेशन फाउंडेशनचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार युवराज हिरवे यांना जाहीर

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील कळंबआंबा येथील भूमिपुत्र ,मानेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे प्र मुख्याध्यापक युवराज अभिमन्यू हिरवे यांच्या शैक्षणिक उल्लेखनीय कार्याची दखल घेऊनध्येय एज्युकेशन फाउंडेशनचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

शिक्षण क्षेत्रातील सातत्य पूर्ण कार्य, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी कायम धडपड, विविध शैक्षणिक उपक्रमातील नाविन्यता, सामाजिक उपक्रमात सक्रिय योगदान शाळा परिसर व गाव परिसर ५०० च्या वर झाडे लावुन संगोपन केले. लोकसहभागातुन विद्यार्थ्यांना लॅपटॉप संगणक दिले.शाळा तंबाखूमुक्त केली व



तालुक्यातील शाळा तंबाखुमुक्त करण्यासाठी तालुका समन्वयक म्हणुन कार्य केले. आडस केंद्र तंबाखुमुक्त केले. बालविवाह रोखण्यासाठी केद्रसमन्वयक म्हणुन कार्य केले. पाणी फाऊंडेशन वॉटरकप स्पर्धा हिरीरीने सहभाग, गावाला व्दितीय क्रमांकाचे बक्षीस मिळवुन दिले. करोना कालावधीमध्ये वेगवगेळ्या सेवाभावी संस्थेच्या माध्यामातुन गरजू व्यक्तीनां अन्नधान्य किट चे वाटप केले. अंधश्रद्धा निर्मूलन, स्वच्छता मोहीम विविध स्पर्धा यांचे आयोजन,अक्षर परिवार समूह कार्य, महापुरुषांच्या जयंती पुण्यतिथि व्याख्याने, कविसंमेलन, पोवाडे, साजरे करून सामाजिक सलोखा अबाधित ठेवण्यासाठी पुढाकार घेतला अशा कार्याची दखल घेऊन त्यांना आदर्श शिक्षक पुरस्कार ग दि माडगूळकर नाट्यगृह निगडी पिंपरी चिंचवड पुणे या ठिकाणी विविध मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. यापूर्वी त्यांना जलरत्न पुरस्कार, आदर्श शिक्षक पुरस्कार, कोरोना योद्धा पुरस्कार यासह विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे. हा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

## एसआयआर मॅपिंग विशेष मोहिमेचा कालावधी वाढवा-प्रा.बबनराव आंधळे

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यामध्ये एस आय आर मॅपिंगचे काम सुरू आहे या सर्वे मधील विविध समस्या संदर्भात शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी आणि निवडणूक निर्णय अधिकारी यांची भेट घेऊन चर्चा करून निवेदन दिले आहे. निवेदनात म्हटले आहे की,जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी बीड यांचे आदेश जा.क्र २०२६/ पुर्ननिरीक्षण/ सीआर/कावि ९४ दि-२/०३/ २०२६ उपरोक्त संदर्भीय विषयांवर सविनय कळविले की,ऑक्टोबर २०२४ च्या मतदार यादी मध्ये असलेले मतदार सन २००५ रोजीच्या मतदार यादीमधील मतदाराशी मतदार मॅपिंग करणे,मतदार यादीतील नोंदी अद्यावत करणे, नोंदीची पडताळणीकरणे इत्यादी



कामकाजासाठी बी एल ओ यांना दिनांक १० मार्च २०२६ ते २० मार्च २०२६ या कालावधीत पूर्ण वेळ कामाकरिता कार्यमुक्त करून बी एल ओ ला सदरील काम कर्तव्यदक्ष पणे करण्याचे आदेश आहेत.वोटर टू वोटर मॅपिंगचे काम प्रगती पथावर असले तरी प्रोजेनी मॅपिंगचे काम प्रलंबित आहे.प्रोजनी मॅपिंगसाठी महिलांची माहेरकडील माहिती मिळवण्यासाठी लागणारा वेळ व माहिती उपलब्धतेचे मर्यादित स्त्रोत यामुळे बीड जिल्ह्यातील प्रोजनी मॅपिंगचे काम विहित वेळेत पूर्ण होत नाही सदर काम पूर्ण करण्या साठी जिल्ह्यातील बी एल ओ यांना विशेष मोहिमेचा कालावधी पुढील दिवसासाठी अजून वाढवून देणे गरजेचे आहे करिता विनंती की,मॅपिंग विशेष मोहिमेचा कालावधी वाढवून देण्यात यावा तसेच जे बीएलओ काम चुकारपणा करत आहेत अशांना सक्तीचे समज द्यावे अशी मागणी ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा बीड जिल्हा सहकार बोर्डाचे संचालक प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे केली आहे.

## हिंदू मुस्लिम मिळवून केली ईद साजरी



दैनिक वादळ वार्ता
**लहुरी । शेख नसीर**

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी लहुरी येथे रमजान ईद साजरी करण्यात आली या तीन मधून सामाजिक सलोखा आणि भाईचाऱ्याचा संदेश देण्यात आला विविध जाती-धर्मातील लोकांनी मिळून ईद साजरी करण्यात आली या कार्यक्रमाला विविध समाजातील मान्यवरांची उपस्थिती लाभली पंचायत समिती सभापती विष्णू भाऊ घुले जि. प.स. विजयकांत मुंडे रिपाई दीपक तालुकाध्यक्ष दीपक भाऊ कांबळे. सरपंच उपसरपंच.सय्यद महेबूब शेख वाहेद चेरमन शेख सयमुद शेख आयनोदिन व नसीर बाबा पत्रकार व पदाधिकारी उपस्थित होते मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव व गावकरी उपस्थित होते रमजान ईद च्या माध्यमातून सामाजिक सलोखा शांतता आणि भाईचारा ह्याचा प्रभावी संदेश सर्व समाजामध्ये देण्यात आला.

## चक्क जावयाला धमक्या देवून जमीन मागणा-या मेव्हणा व सासऱ्या विरुध्द केज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

चक्क जावयाला धमक्या देवून जमीन मागणा-या मेव्हणा व सासऱ्या विरुध्द केज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जुन्या भांडणाच्या कारणावरून तु आमच्या वर केलेल्या केसेस मागे घे व मौजे टाकळी,ता. केज येथील सर्व्हे क्रमांक ७७ मधील शेत जमीन माझ्या नावावर कर असे म्हणून शिवीगाळ व जिवे मारण्याच्या धमक्या देणारा मेव्हणा जूनेद उर्फ जोजो आणि




सासरा शेख शाकेर अहेमद या दोघांविरुध्द ड. सलाहुद्दीन काझी यांच्या तक्रारीवरून भारतीय न्याय संहिता चे कलम ३५१(२),३५२आणि ३ (५) प्रमाणे केज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली केज पोलिस करीत आहेत.

## नातवाला गोट्या खेळण्यावरून विचारल्याचा राग खरवड येथे महिलेवर लोखंडी कोड्याने जीवघेणा हल्ला

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**


तालुक्यातील खरवड येथे एका किरकोळ घरगुती वादाचे पर्यवसान मारहाणीत झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. आपल्या नातवाला गोटच्या खेळण्यावरून विचारल्याचा राग आल्याने संशयित आरोपीने एका ५३ वर्षीय महिलेवर लोखंडी कोड्याने हल्ला करून तिला जखमी केले आहे.खरवड येथील रहिवासी उषाबाई रमेश ठाकरे (वय ५३) या १८ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास आपल्या घरासमोरील अंगणात होत्या. यावेळी त्यांनी आपल्या नातवाला सहज विचारले की, तुझ्या बापाने तुला गोट्या खेळायला घेऊन दिल्या आहेत का?. या साध्या बोलण्याचा राग संशयित आरोपी किसन पाडवी (रा. खरवड) याला आला.संशयित आरोपीने रागाच्या भरात फिर्यादी उषाबाई यांना अश्लील शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. वाद इतका विकोपाला गेला की, संशयिताने हातातील लोखंडी कोड्याने उषाबाईंच्या डोक्यावर आणि कपाळावर जोरात प्रहार केला. या हल्ल्यात त्या गंभीर जखमी झाल्या असून संशयिताने त्यांना हाताबुक्यांनी देखील मारहाण केली.याप्रकरणी २० मार्च २०२६ रोजी तळोदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संशयित आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ११५(२) आणि ३५२ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.तळोदा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक राजन मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक भिमसिंग ठाकरे या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

## अंबाजोगाई येथील माजी न्यायमूर्ती सुधाकरराव कुर्डूकर यांचे निधन

दैनिक वादळ वार्ता
**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई येथील भुमीपुत्र माजी न्यायमूर्ती भारताचे माजी मुख्य न्यायाधीश श्री.सुधाकर पंडितराव कुर्डूकर यांचे शनिवार २१ मार्च २०२६ रोजी मुंबई येथे निधन झाले.मृत्यू समयी त्यांचे वय ९१ वर्ष होते.

अंबाजोगाईच्या देशपांडे गल्लीतील मुळ रहिवासी असलेले सुधाकरराव पंडितराव कुर्डूकर हे भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश होते.त्यांनी पंजाब आणि हरियाणा उच्चन्यायालया चे सरन्यायाधीश म्हणून काम केले.मुंबई उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणुन काम केले.पंजाब चे प्रभारी राज्यपाल म्हणुन ही त्यांनी काम पाहिले.योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या सर्व साधारण सभेचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम पाहिले. सेवानिवृत्त झाल्यानंतर



ही त्यांनी शेवटच्या क्षणापर्यंत सहाय्यक सरकारी वकील आणि सार्वजनिक अभियोक्ता, शासनाच्या विविध प्रकल्पाचे सल्लागार म्हणुन काम पाहिले. कुर्डूकर यांच्या पश्चात पत्नी, मुली, जावई, नातवंडे, भाऊ असा परिवार आहे.सुधाकर कुर्डूकर यांच्या पार्थिवावर चंदनवाडी स्मशानभूमी, चारणी रोड गिरगाव,मुंबई येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध स्तरातील नागरिक उपस्थित होते.

# संपादकीय

## सरणार कधी रण...



गेले २० दिवस सुरू असलेले इराण विरुद्ध अमेरिका–इस्रायल यांच्यातील युद्ध आता भारतासह विविध देशांमधील दिवसेंदिवस घटणारे इंधनसाठे आणि गॅसच्या भीषण तुटवड्याच्या वळणावर येऊन पोहोचले आहे. इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीतून इंधनवाहक जहाजांची वाहतूक रोखल्यानंतर अनेक देशांतील इंधनपुरवठा विस्कळित झाला होताच; आता परस्परांचे तेलसाठे आणि ऊर्जा प्रकल्पांवरील हल्ल्यांची त्यात भरच पडली आहे.अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 'आपल्याला या हल्ल्याची कल्पना नव्हती,' असे म्हणून त्यातून अंग काढून घेण्याचा केलेला प्रयत्न तेच दर्शवतो. दुसरीकडे तेल आणि वायूसाठ्यांवरील हल्ल्यांचा परिणाम दूरगामी ठरणार असून, या हानी झालेल्या प्रकल्पांतून पुरवठा पूर्ववत होण्यास काही महिने–वर्षेही लागू शकतात, या कतारने दिलेल्या इशाऱ्यातून इंधनचटके तीव्र होत जाणार, हे स्पष्ट दिसते. त्यामुळेच कोणत्या ना कोणत्या मार्गाने या परिस्थितीला उतार पडावा, अशी साऱ्यांचीच इच्छा असली, तरी बड्या युद्धखोर देशांच्या गळ्यात घंटा कोण बांधणार, असाच प्रश्न साऱ्या जगाला पडला आहे.साऱ्या जगाच्या इंधनाची गंगोत्री असलेल्या पश्चिम आशियात युद्धाचा भडका उडाला, तेव्हापासूनच तेल आणि नैसर्गिक वायूच्या टंचाईची चाहूल लागली होती. नैसर्गिक द्रवरूप वायूची कोणतीही टंचाई नसल्याची गुळगुळीत झालेली रेकॉर्ड सातत्याने वाजवून सरकार याबाबतच्या 'नॅरेटिव्ह'ला विरोधकांना जबाबदार धरत असले, तरी देशांतील बहुतांश शहरांमध्ये स्वयंपाकाच्या गॅस सिलिंडरसाठी लागलेल्या रांगा आणि ठिकठिकाणी गॅसअभावी बंद पडणारी हॉटेले आणि खाद्यपदार्थांच्या टपऱ्या यांमुळे वास्तव सर्वांपुढे आले आहे. मुळात होर्मुझचा मार्ग बंद झाल्यावर देशाच्या साठ टक्के गॅस आयातीपैकी ९० टक्के पुरवठा विस्कळित झाला होता. युद्ध सुरू झाल्यावर गॅस सिलिंडरची दरवाढ आणि व्यावसायिक सिलिंडरच्या पुरवठ्यावर निर्बंध आणण्याच्या सरकारच्याच निर्णयांमुळे नागरिकांमध्ये संभ्रमावस्था निर्माण झाली, ही वस्तुस्थिती आहे.मधल्या काळात इराणमधून जहाजांना मार्ग मिळाला असला, तरी आजपर्यंत केवळ दोन–तीनच जहाजे पोहोचू शकली आहेत. देशातील सिलिंडरचा पुरवठा सुरळीत असल्याचे कंपन्या सांगत असल्या, तरी ७५ लाखांपुढे गेलेली दैनंदिन मागणी पुरवणे सद्यस्थितीत आव्हानाचे ठरले आहे; व्यावसायिक सिलिंडरचा पुरवठा खुंटल्याने मेन्यूकार्डांवरील पदार्थांमध्ये घट, चुली–शेगड्यांवर स्वयंपाक आणि काळ्या बाजारात तीन हजार रुपयांपर्यंत गेलेले सिलिंडरचे दर, असे हॉटेल उद्योगावरील परिणाम भीषण ठरले आहेत. दुसरीकडे पेट्रोल–डिझेलची टंचाई आजघडीला भेडसावत नसली, देशात ५० दिवसांचा साठा असताना त्यातील २० दिवस उलटून गेल्याने भविष्यात काय घडेल, हे सांगता येत नाही. त्यातच इंधनसाठे लक्ष्य होऊ लागल्याने कच्च्या तेलाचे दर पुन्हा प्रतिबॅरल ११४ डॉलरपर्यंत पोहोचले आहेत.या युद्धात दोन हजारांहून अधिक बळी गेले आहेत. मात्र, नव्या घडामोडींमुळे जगाचे लक्ष आता इंधनसाठ्यांकडेच लागले आहे. ट्रम्प यांनी 'इस्रायल पुन्हा इंधनसाठ्यांवर हल्ले करणार नाही,' अशी हमी दिली. 'इस्रायलने रागाच्या भरात हल्ला केला,' हे ट्रम्प यांचे विधान 'आपला तो बाब्या' गटात मोडणारेच आहे. 'इराणच्या तेलसाठ्यांवरील हल्ला अन्यायकारक होता,' म्हणणारे ट्रम्प सरावाच्या युद्धनौकेवरील आपलाच हल्ला सोयीस्करपणे विसरतात. इराणनेही सबुरीची भूमिका घेतल्याने सध्यापुरते तरी इंधनसाठे हल्ल्यापासून दूर राहतील, अशी आशा आहे. खरे तर हे युद्धच थांबवण्यासाठी आखातातील तेल पुरवठादार देशांचा अमेरिकेवर दबाव आहे.

'इराणकडून गंभीर धोका नव्हता, इस्रायली 'लॉबी'च्या दबावाखाली युद्ध सुरू केले,' असा गौप्यस्फोट करून अमेरिकेच्या दहशतवादविरोधी केंद्राचे संचालक जो केंट यांनी ट्रम्पना अडचणीत आणले आहे. सोबतच दोनशे अब्ज डॉलर युद्धखर्चासाठी 'पेंटॅगॉन'ला संसदेच्या नाकदुऱ्या काढाव्या लागणार आहेत. जगभरातला तेलबाजार हेलकावे खात असला, तरी होर्मुझच्या नाकेबंदीचे परिणाम प्रामुख्याने भारत, चीन आणि जपान आदींना भोगावे लागत आहेत. शेजारील पाकिस्तानमध्ये तर आठ–दहा दिवसांचेच इंधनसाठे शिल्लक राहिल्याने आणीबाणीची स्थिती निर्माण झाली आहे. युद्धपातळीवर उपाययोजना न केल्यास आपल्याकडेही तीच वेळ येऊ शकते, याची जाणीव ठेवलेली बरी.

# मुख्यमंत्री मा.देवेंद्र फडणवीस यांच्या एका फोननंतर छत्रपती शिवेंद्रसिंहराजे यांची धुरंधर राजकीय खेळी

## सातारा जिल्हा परिषदेवर पहिल्यांदाच भाजपाचा झेंडा!

## भाजपा जिल्हा परिषद अध्यक्षाचा एका मताने विजय

**सार्वजनिक बांधकाम मंत्री मा छत्रपती शिवेंद्रसिंहराजे यांची धुरंधर राजकीय खेळी मानली जात असून, मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या फोननंतर भाजपने बाजी उलटवली असल्याचे बोलले जात आहे. भाजपच्या जिल्हा परिषद अध्यक्षपदाचा एका मताने थरारक विजय हा साताऱ्यात भाजपाचा करिश्मा पुन्हा एकदा अधोरेखित करणारा विजय ठरला आहे.**



दैनिक वादळ वार्ता
**सातारा । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या जिल्हा परिषद निवडणुकांनंतर सातारा जिल्हा परिषदेमध्ये राजकीय समीकरणांना कलाटणी देणारी मोठी घडामोड घडली आहे. राज्याच्या स्थापनेनंतर प्रथमच सातारा जिल्हा परिषदेत भारतीय जनता पक्षाने सत्ता स्थापनेत यश मिळवले आहे. विशेष म्हणजे, राज्यभरात दिसून आलेला भाजपाचा करिश्मा आता सातारा जिल्ह्यातही स्पष्टपणे पाहायला मिळाला आहे.या निवडणुकीत भाजपाचे संख्याबळ केवळ २८ सदस्यांपर्यंत मर्यादित असताना, राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री आणि जिल्ह्याचे सुपुत्र मा. छत्रपती शिवेंद्रसिंहराजे यांनी आपल्या अचूक राजकीय रणनीतीने अतिरिक्त पाठिंबा मिळवत एकूण ३३ सदस्यांचा पाठिंबा भाजपाच्या बाजूने उभा केला. याउलट शिवसेना–राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी गटाला केवळ ३० मते मिळाली, ज्यामुळे जिल्ह्यातील सत्ता समीकरण पूर्णपणे बदलले आहे.या निर्णायक बहुमताच्या आधारे भाजपाच्या प्रिया शिंदे यांची सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. तसेच उपाध्यक्ष पदी राजू भोसले यांना संधी मिळाली आहे. या विजयामुळे केवळ सत्ता परिवर्तन झाले नाही, तर साताऱ्यासारख्या पारंपरिक राजकीय बालेकिल्ल्यात भाजपाने आपली मजबूत पकड निर्माण केल्याचे स्पष्ट झाले आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कॅबिनेट मंत्री छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली घडलेली ही राजकीय खेळी सातारा जिल्ह्यासह राज्याच्या राजकारणात महत्त्वपूर्ण ठरली आहे. स्थानिक पातळीवरील सूक्ष्म नियोजन, प्रभावी संवाद आणि संघटन कौशल्य यामुळे भाजपाला हा ऐतिहासिक विजय मिळवता आला.सातारा जिल्हा परिषदेत पहिल्यांदाच भाजपाचा झेंडा फडकला असून, यामुळे आगामी काळात जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. तसेच, या निकालामुळे राज्यातील राजकीय समीकरणांवरही दूरगामी परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# चैत्र नवरात्रौत्सवात उदे ग अंबे उदे च्या सुरांनी दुमदुमले ठाणे




दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

ठाण्यात चैत्र नवरात्रौत्सवाच्या उत्साहाला भक्तीमय वातावरणात प्रारंभ झाला आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून ठाणे पूर्व, कोपरी येथील संत तुकाराम क्रीडांगणात धर्मवीर श्री आनंद दिघे प्रतिष्ठान आयोजित चैत्र नवरात्रोत्सवात पहिल्याच दिवशी भक्ती, संगीताच्या सुरेल कार्यक्रमाने वातावरण भक्तीरसात न्हाऊन निघाले. यावेळी उपस्थित भाविक रसिक महिलांनी तर मंडपातच फेर धरून मातृशक्तीच्या सुरेल सादरीकरणाला दाद दिली. चैत्र शुद्ध प्रतिपदा अर्थात गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर दुपारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चैत्र नवरात्रौत्सवात देवीची प्राणप्रतिष्ठा करून सहकुटुंब विधिवत पूजन केले. सायंकाळी ठाण्याच्या महापौर शर्मिला रोहित पिंपळोलकर यांच्या हस्ते देवी मातेची विधीवत आरती करण्यात आली. यावेळी शिवसेना कल्याण जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, प्रकाश कोटवानी, राहुल लोंढे यांच्यासह अनेक शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या नवरात्री सोहळ्याच्या पहिल्याच दिवशी मातृशक्तीच्या कलेचा अविष्कार पहावयास मिळाला. प्रसिद्ध गायिका धनश्री देशपांडे, केतकी भावे–जोशी आणि केतकी चैतन्य यांच्यासह संपूर्ण महिला वाद्यवृंदांचा सहभाग असलेला उदे ग अंबे उदे हा देवी मातेचा जागर कार्यक्रम पार पडला. देवी मातेच्या स्तुतीगीतांसह अनेक नव्या जुन्या आणि पारंपरिक हिंदी – मराठी गीतांच्या सादरीकरणाने कार्यक्रमाला भक्तिमय रंग चढला. उत्तरोत्तर रंगत गेलेल्या संगीतमय कार्यक्रमात विविध कलावंतांनी आपली कला सादर केल्याने वातावरण केवळ भारावुनच नव्हे तर या मातृशक्तीने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. तुझ्याविना वैकुंठाचा... या रखुमाईच्या गीताने प्रारंभ झालेल्या या कार्यक्रमात अनेक मराठी व हिंदी भावगीते, लावणी आणि पारंपारिक लोकगीतांच्या सादरीकरणाने कार्यक्रमात विविधता आणली. गायिका धनश्री देशपांडे हिने तर रसिकांनाच उत्स्फूर्तपणे गाण्यामध्ये सहभागी करून घेतले. केतकी चैतन्य हिने ग.दि.माडगूळकर यांच्या रचनांवर आधारित बाबुजींनी संगितबद्ध केलेल्या जाळीमंदी पिकली करवंद... ही लावणी सादर करून रसिकांची दाद मिळवली, तर, केतकी भावे–जोशी यांनी रेशमाच्या रेघांनी...लाल काळ्या धाग्यांनी तसेच आदि माया अंबाबाई... साऱ्या दुनियेची आई या गीतांनी देवीभक्तीची अनुभूती दिली. एकविरा आई तू डोंगरावरी... या गीतावर महिला रसिकांनी फेर धरत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमाची सांगता नॉनस्टॉप कोळी गीतांनी झाली, ज्यामुळे वातावरणात जल्लोषाचे रंग भरले. तालरक्षक म्हणून तबल्यावर मुक्ता रस्ते आणि ढोलकी व इतर वाद्यांवर निशा मोकल यांनी उत्कृष्ट साथसंगत देत कार्यक्रमाची शोभा वाढवली. बासरीवादक भावना हाडवळे यांनी संगिताच्या या सुरेल सुरांच्या मैफलीला बहारदार सोबत केली. या संपूर्ण संगीतमय सोहळ्याचे प्रभावी व आशयपूर्ण निवेदन स्मिता गवाणकर यांनी केले. चैत्र नवरात्रोत्सवाच्या पहिल्याच दिवशी भक्ती, परंपरा आणि संगीताचा संगम अनुभवायला मिळाल्याने ठाणेकरांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# वडवणी ते शिखर शिंगणापुर पायी दिंडीचे प्रस्थान



दैनिक वादळ वार्ता
**वडवणी । प्रतिनिधी**

दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी चैत्र एकादशीनिमीत्त वडवणी येथून दि. १९ मार्च २०२६ गुरुवार रोजी वडवणी येथून मोठा महादेव शिखर शिंगणापूर याकडे पायी दिंडी रवाना झाली.वडवणी ते शिखर शिंगणापूर पायी दिंडी सोहळा वडवणी येथील किसन बाबा ओतारी यांनी ४६ वर्षांपूर्वी या पायी दिंडी सोहळ्याला सुरुवात केली होती. आज त्यांच्या आशिर्वादाने दिंडी चालक म्हणून गेणाबापु पाटोळे व दिनकर फड यांच्या मार्गदर्शनाखाली दिंडीचे नियोजन केले जाते.या दिंडीमध्ये शंभो महादेव फक्त घोडके नाथा यांची कावड, शिवाजी पाटोळे कावड, दिनकर फड यांची काठी, गोरख घोडके यांची शंभू महादेवाची काठी, कावड असते. पहिला मुक्कामचिखलबीड, दुसरा मुक्काम एकुरका, तिसरा मुक्काम जवळूका, चौथा मुक्काम भुम, पाचवा मुक्काम शेंद्री, सहावा मुक्काम कदम वस्ती, सातवा मुक्काम टेंभुर्णी, आठवा मुक्काम गायकवाड वस्ती, नववा मुक्काम नातेपुते, दहावा मुक्काम शिखर शिंगणापूर येथे होईल. या दिंडीत पायी जाणारे शिवभक्त शंकर झाडे, बबन भुजबळ, सुनिल डिगे, श्रीकिसन घोडके, चैतन्य राऊत, प्रदिप पाटोळे, महादेव पंधारे, गोरख घोडके, प्रदिप घोडके, कोंडीराम गुरसाळी, विकास फड, आकाश फड, नाना अंधारे, दत्तात्रय करळे, तुकाराम चौरे, डिगांबर जाधव, रवी शिंदे, सह असंख्य शिवभक्त या दिंडीत उपस्थित आहेत.

# कोप्रोली येथे श्री साई चरित्र पारायण, श्री सत्यनारायण महापूजा उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

सालाबाद प्रमाणे ॐ साई सार्वजनिक पदयात्रा मंडळ कोप्रोली (उरण )यांच्या सौजन्याने गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर विविध धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. यावर्षीही गुढीपाडव्याचे औचित्य साधून बुधवार दिनांक १८/३/२०२६ ते गुरुवार दिनांक १९/३/२०२६ रोजी श्री साईबाबांचे साई चरित्र पारायण व श्री सत्यनारायणाचे महापूजा व साई भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. बुधवार व गुरुवारी दररोज काकड आरती, बाबाचे मंगल स्नान,श्री साई चरित्र पारायण, मध्यान्ह आरती, हरिपाठ, साईबाबांचे धुपारती असे विविध धार्मिक उपक्रम मोठया उत्साहात संपन्न झाले.दि १९/३/२०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या साई भंडाराचा (महाप्रसादाचा ) साई भक्तानी, भाविक भक्तांनी मोठ्या प्रमाणात लाभ घेतला. रात्री ९ वाजता श्री बापूजी देव कला मंच व अर्णवी आर्ट कोप्रोली उरण प्रस्तुत साई गीत, लोकगीत,कोळीगीतांचा मराठी नजराणा कार्यक्रम सादर करण्यात आले. आलेल्या प्रत्येक प्रमुख पाहुण्यांचे तसेच समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवरांचा यावेळी विशेष सत्कार करण्यात आला.उरण तालुक्यातील कोप्रोली गावातील गणेश मंदिर येथे आयोजित केलेल्या या कार्यक्रमाला जनतेचा भाविक भक्तांचा उत्तम प्रतिसाद लाभला. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री साई सार्वजनिक पदयात्रा मंडळ कोप्रोली व साई सेवक, ॐ साई सार्वजनिक पदयात्रा मंडळ उरण व साई सेवक, श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्था, सर्व महिला बचत गट, माऊली हरिपाठ मंडळ, सर्व क्रिकेट क्लब, बापूजी देव कला मंच, अर्णवी आर्ट, थ्री व फोर व्हीलर रिक्षा चालक–मालक संघटना कोप्रोली, ग्रामस्थ मंडळ कोप्रोली आदी विविध संस्था,संघटनेच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली. सर्वच कार्यक्रमाचे सुंदर,उत्तम असे नियोजन व आयोजन केल्याने सर्वांनी या कार्यक्रमाचे कौतुक केले.

# शाश्वत भातशेतीसाठी यांत्रिकीकरण आवश्यक–डॉ.पी.यू.शहारे



दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

मजुरांची कमतरता आणि मजुरीचे वाढते दर लक्षात घेता शाश्वत भातशेतीसाठी यांत्रिकीकरणाची कास धरणे आवश्यक आहे,असे प्रतिपादन डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. पी. यू. शहारे यांनी केले.आदिवासी उप योजना, अखिल भारतीय समन्वित बियाणे ( पिके ) योजनेंतर्गत येथील प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राच्या सह्याद्री अतिथी गृह सभागृहात आयोजित भात पीक बीजोत्पादन प्रशिक्षण कार्यक्रमात अध्यक्षीय मार्गदर्शन करताना ते बोलत होते.व्यासपीठावर सहयोगी संशोधन संचालक डॉ. भरत वाघमोडे, कृषी विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ.रवींद्र मर्दाने, तालुका कृषी अधिकारी आर. ए. शिंदे उपस्थित होते. डॉ. शहारे यांनी भात लावणीपासून कापणीपर्यंत लागणाऱ्या विविध यंत्रांची माहिती देत अल्प खर्चाची,कमी कष्टाची व फायदेशीर शेतीसाठी यांत्रिकीकरणाचे विविध पैलू समजावून सांगितले.ते म्हणाले की, एक एकर भात लावण्यासाठी सव्वा लाख वेळा वाकावे लागते.एक हेक्टर भात शेती क्षेत्रासाठी बैलाच्या सहाय्याने लाकडी नांगर वापरताना ६४ किलोमीटर चालावे लागते तेव्हा भात शेती होते.हे कष्टप्रद असल्याने भात शेतीत यांत्रिकीकरण काळाची गरज आहे.डॉ. वाघमोडे यांनी जमिनीच्या प्रकारानुसार भात जाती कशा निवडाव्यात , पोषणमूल्ये असलेल्या तसेच भाकरी, पोहे, मुरमुरे, जेवणाचा आस्वाद वाढविणाऱ्या वेगवेगळी गुणवैशिष्ट्ये असलेल्या भात जातींचा कसा वापर करावा,हे पटवून दिले.शेतकऱ्यांनी वेळोवेळी संशोधन केंद्राला भेट देऊन नवतंत्रज्ञान जाणून घेतल्यास त्यांच्या उत्पन्नात निश्चित वाढ होईल,असे नमूद केले.शिंदे यांनी शासनाच्या विविध कृषीविषयक योजनांचा उहापोह करीत शेतकरी गट नोंदणी करण्याबाबतची पद्धती,त्याचे फायदे सांगून लाभ घेण्याचे आवाहन केले.यावेळी आदिवासी उप योजनेंतर्गत शिलारवाडी, खरबाची वाडी, खोंडेवाडी व नागेवाडीच्या पाच गटाला मनुष्यचलित भात लावणी यंत्र, नॅपसॅक स्प्रे पंप, तसेच ५० शेतकऱ्यांना युरिया ब्रिकेट्स, वैभव विळे, पॉकेट डायरी, घडीपत्रिकांचे वितरण डॉ. शहारे यांच्या हस्ते करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने यांनी केले. तांत्रिक सत्रात क. भात पैदासकार डॉ. महेंद्र गवई यांनी 'भात बीजोत्पादन लागवड तंत्रज्ञान ', वनस्पती शरीरक्रिया शास्त्रज्ञ डॉ.मीनाक्षी केळुस्कर यांनी ' भात बीजोत्पादन नोंदणी ', मृदा शास्त्रज्ञ डॉ.देवदत्त जोंधळे यांनी 'भात पिकासाठी खत व्यवस्थापन आणि सेंद्रिय खत निर्मिती तंत्रज्ञान ' , कीटकशास्त्रज्ञ डॉ.वैशाली सावंत यांनी 'भात बीजोत्पादन प्रक्षेत्रावरील कीड व रोग व्यवस्थापन ' , स.उद्यानविद्यावेत्ता डॉ.राजेंद्र सावळे यांनी ' रोपवाटिका आणि भाजीपाला व्यवस्थापन ' यावर मार्गदर्शन केले.यावेळी शास्त्रज्ञांनी विविध शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसनही केले.

# उमेद महिला स्वयंसहायता समुहाच्या शेवया व पापड उद्योग केंद्राचे उद्घाटन

## महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचा उपक्रम

दैनिक वादळ वार्ता
**आरमोरी । प्रतिनिधी**

जोगीसाखरा येथील जय भवानी महिला स्वयंसहायता समुह, प्रज्ञा महिला ग्रामसंघ व जय भवानी महिला गट यांच्या शेवया व पापड उद्योग विक्री केंद्राचे नुकताच उद्घाटन समारंभ सोहळा संपन्न झाला.महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष,आरमोरी जिल्हा गडचिरोली अंतर्गत जय भवानी महिला स्वयंसहायता समुह, प्रज्ञा महिला ग्रामसंघ व जय भवानी महिला गट ,यांचे मशीन व्दारे शेवया व पापड उद्योग विक्री केंद्राचे उद्घाटन समारंभ सोहळा नुकताच संपन्न झाला. या वेळी आय.बी.सि.बी. अर्चना मोडक मॅडम, मंगेश बोदेले, प्रभाग समन्वयक मुकेश कोल्हे, माजी पंचायत समिती सदस्य वृंदाताई गजभिये, प्रज्ञा ग्राम संघाच्या अध्यक्ष अनिताताई मडावी, सचिव उषाताई गेडाम,विशाखा सहारे सिनिअर आय .सि.आर. पी. , अध्यक्षा सरीताताई सयाम,सहाय्यक चित्रलेखाताई बडवाईक, ग्राम सखी खेमलताताई हजारे, पशुसखी शर्मिला धोंगडे, बँक सखी रीना घुटके,हंसागर सोरते, आणि उमेद समुहातील संपूर्ण महिला प्रामुख्याने उपस्थित होते.हा महाराष्ट्र शासनाचा महत्वाचा उपक्रम असून याचा उद्देश ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणे आहे. या अंतर्गत महिला स्वयंसहायता समुह तयार करून त्यांना उद्योग उभारण्यासाठी पुढाकार घेऊन मदत केली जाते. शेवया व पापड मशीन व्दारे उद्योग हा महिलांसाठी अतिशय चांगला,कमी भांडवलात सुरू होणारा आणि घरबसल्या चालणारा व्यवसाय आहे. शेवया आणि पापड हे रोजच्या वापरातील खाद्यपदार्थ असुन मशीनच्या मदतीने मोठ्या प्रमाणात उत्पादन करून स्थानिक बाजारात, किराणा दुकानात किंवा ऑनलाईन विक्री करता येतो.आजच्या दैनंदिन जीवनात शेवया व पापड ला अतिशय मागणी आहे.त्यामुळे सदरील उद्योग हा भरभराटीस येवून उमेद स्वयंसहायता गटातील महिला अधिक सक्षम बनल्याशिवाय राहणार नाहीत. असा विश्वास या वेळी व्यक्त करण्यात आला.




# देगलूर एसबीआय बँकेत ग्राहकाची फसवणूक होता-होता बचावली

## कॅशियरकडून १२ हजार रुपये कमी दिल्याने खळबळ

दैनिक वादळ वार्ता
**देगलूर । प्रतिनिधी**

येथील तुकाराम नगरी परिसरातील जिपी टावर येथील स्टेट बँक ऑफ इंडिया (डइख) शाखेतील कर्मचाऱ्यांचा मनमानी आणि गलथान कारभार समोर आला आहे. बँकेतील कॅशियरने एका ग्रामीण भागातील महिलेला २२ हजार रुपयांऐवजी केवळ १० हजार रुपये देऊन घरी पाठवण्याचा प्रयत्न केला. सुदैवाने महिलेच्या मुलाने वेळीच पैसे मोजल्यामुळे हा प्रकार उघडकीस आला. मात्र, या घटनेमुळे बँकेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, संबंधित कॅशियर आणि उद्धट वागणूक देणाऱ्या चौकशी अधिकाऱ्यावर प्रशासन काय कारवाई करणार? याकडे आता संपूर्ण देगलूरकरांचे लक्ष लागले आहे.



**काय आहे नेमकी घटना?**

१८ मार्च रोजी दुपारी १२:३० ते १ च्या सुमारास तुकाराम नगरी परिसरातील एक महिला पैसे काढण्यासाठी एसबीआय बँकेत गेली होती. विड्रॉल स्लिप २२ हजार रुपयांची असतानाही कॅशियरने महिलेच्या हातात केवळ १० हजार रुपये दिले. ग्रामीण भागातील ही महिला पैसे घेऊन बाहेर पडत असताना तिच्या सतर्क मुलाने पुन्हा पैसे मोजले. त्यात तब्बल १२ हजार रुपये कमी असल्याचे लक्षात येताच मुलाने थेट कॅशियरची केबिन गाठली. सुरुवातीला टाळाटाळ झाली, पण चूक समोर येताच कॅशियरने तातडीने उर्वरित १२ हजार रुपये मुलाच्या स्वाधीन केले.

**अधिकारी गप्पांत व्यस्त, ग्राहकांना तुच्छतेची वागणूक**

एककीडे कॅशियरची ही गंभीर चूक समोर आली असताना, दुसरीकडे बँकेतील 'चौकशी खिडकी'वरील चित्र संतापजनक होते. खात्यात किती शिल्लक आहे, हे विचारण्यासाठी गेलेल्या महिलेच्या मुलाला संबंधित अधिकाऱ्याने अरेरावीची भाषा वापरली. बँकेत ग्राहकांच्या लांबच लांब रांगा लागलेल्या असतानाही चौकशी अधिकारी आपल्या सहकाऱ्यांशी गप्पा मारण्यात मग्न होते. सामान्य नागरिकांना सन्मानाने वागणूक देण्याऐवजी त्यांच्याशी उद्धटपणे बोलणाऱ्या या अधिकाऱ्याबद्दल प्रचंड रोष व्यक्त होत आहे.

**कठोर कारवाईची देगलूरकरांची मागणी**

या घटनेमुळे ग्रामीण भागातील अशिक्षित किंवा साध्या ग्राहकांची बँकेत कशा प्रकारे लूट होऊ शकते, हे स्पष्ट झाले आहे. बँकेच्या वरिष्ठ व्यवस्थापनाने या प्रकरणाची गंभीर दखल घ्यावी. पैसे कमी देणारा कॅशियर आणि ग्राहकांशी गैरवर्तन करणारा चौकशी अधिकारी या दोघांवरही कठोर कारवाई करावी, अशी आग्रही मागणी आता देगलूरच्या नागरिकांकडून केली जात आहे. संबंधित विभाग यावर काय पावले उचलणार, याकडे सर्वांचे डोळे लागले आहेत.

# सहाय्यक कृषी अधिकारी कोपनर मॅडम यांच्या उत्कर्ष कार्यामुळे मिळाला लोहा तालुक्याला प्रथम क्रमांक



दैनिक वादळ वार्ता
**लोहा । प्रतिनिधी**

सायाळ सज्जातील सहाय्यक कृषी अधिकारी आदरणीय कोपनर मॅडम यांनी आपल्या उत्कृष्ट कार्याने संपूर्ण तालुक्याचा गौरव वाढवला आहे. महाविस्तार पचे सर्वाधिक डाऊनलोड करून त्यांनी तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवला, ही निश्चितच अभिमानास्पद बाब आहे. सायाळ सज्जातील चारही गावे पोखरा (झजउठ-) योजनेअंतर्गत येत असताना, त्या सर्व गावांमध्ये त्यांनी प्रभावी अंमलबजावणी करून शेतकऱ्यांपर्यंत योजनांचा लाभ पोहोचवला.

रोजगार हमी अंतर्गत फळबाग देखील त्यांनी सज्जामध्ये उत्कृष्ट कामगिरी करत शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन केले. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे आणि मार्गदर्शनामुळे अनेक शेतकरी प्रगतिशील बनले, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करू लागले आणि शेतीत नवकल्पना राबवू लागले.

या उल्लेखनीय कार्याची दखल घेत कृषी महोत्सव २०२६, नांदेड येथे जिल्हा कृषी अधीक्षक आदरणीय दत्तकुमार कळसाईत सर यांच्या हस्ते कोपनर मॅडम यांचा सन्मान करण्यात आला. या सन्मान सोहळ्यावेळी कैलास वानखेडे सर, अनिल शिरफुले सर, संदीप स्वामी सर, तालुका कृषी अधिकारी संजय चातरमल सर, नांदेडचे तालुका कृषी अधिकारी प्रशांत कासराळे सर, लोहा मंडळ अधिकारी सोनखेड दशरथ शिंदे सर तसेच आदरणीय लक्ष्मण हांडे सर आदी मान्यवर उपस्थित होते.कोपनर मॅडम यांचे कार्य हे सर्व कृषी अधिकाऱ्यांसाठी प्रेरणादायी आहे. अशा प्रकारे उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचा सन्मान झाला, तर निश्चितच इतर अधिकारीही अधिक उत्साहाने आणि जबाबदारीने कार्य करतील, ज्याचा थेट फायदा शेतकऱ्यांना होईल. सायाळ सज्जातील सर्व शेतकरी बांधवांच्या वतीने आदरणीय कोपनर मॅडम यांचे हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा

# तालुका पत्रकार संघटनेतर्फे अहेरीत नारी शक्ती सन्मान सोहळा विविध क्षेत्रातील १२ महिलांचा केला सत्कार

दैनिक वादळ वार्ता
**अहेरी । प्रतिनिधी**

अहेरी लोकशाहीत महत्त्वाची भूमिका बजावण्याचा प्रयत्न करणारी तालुकाध्यक्ष ऋषी सुखदेवे यांच्या नेतृत्वातील तालुका पत्रकार संघटनेने शासकीय, निमशासकीय व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून समाजसेवा करणाऱ्या बारा महिलांचा सत्कार कार्यक्रमाचे अध्यक्ष आलापलीच्या उपवनसंरक्षक दिपाली तलमले तथा उद्घाटक म्हणून ३७ बटालियनचे कमांडंट दव इंजिरकम किंडो यांच्या हस्ते आज करण्यात आला.

स्थानिक संत मानव दयाल अनुदानित आश्रम शाळेतील सत्कार सोहळयात बारा महिलांना शाल,सन्मानचिन्ह व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. महिला दिनाच्या औचित्ताने सत्कारमूर्ती म्हणून अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नायब तहसीलदार मनोरमा जाँगी, नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष रोजा करपेत, आलापल्ली वनविभागाच्या वनकर्मचारी सविता संजय अलोने, समाजभूषण पुरस्कार प्राप्त तथा नेपाळ येथील मानवता सन्मानाच्या मानकरी सेवानिवृत्त पर्यवेक्षिका सुशीला भगत, देवलमरीच्या ग्रामविकास अधिकारी एम ए धुर्वे, पेरमिलीच्या अंगणवाडी सेविका लतिका दहागावकर, रेपणपली वनपरिक्षेत्राच्या वनरक्षक रेखा नरोटे, व्यवसाय करून सामाजिक कार्यातून महिलांना एकत्रीकरण करण्याच्या पुरस्कर्त्या किरण भांदककार, कोळसेपल्ली आरोग्य पथकाच्या आरोग्य सेविका विजया रामटेके,पेरमिली पोलीस स्टेशनच्या कॉन्स्टेबल मुस्कान शेख, कमलापूरच्या अशा गट प्रवर्तक विद्यादेवी यजुलवार यांना गौरविण्यात आले.मंचावर बटालियनचे उपकमांडंट चंद्रमोरे अनिल, मेजर तायडे, पत्रकार संघटनेचे अध्यक्ष ऋषी सुखदेवे, शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक भरतकर उपस्थित होते. कमांडंट दव किंडो, डीएफओ दिपाली तलमले यांनी मार्गदर्शन तर सत्कारमूर्ती सुशीला भगत, किरण भांदककार, रेखा नरोटे यांनी मनोगतातून संघटनेचे आभार मानले. यशस्वीतेसाठी पत्रकार संघटनेचे उपाध्यक्ष आसिफ खान पठाण, सचिव रमेश बामनकर डॉ. शंकर दुर्गे श्रीधर दुग्गीरालापाटी, सदाशिव माकडे, बबलू सडमेक दीपक चुनारकर श्रीकांत दुर्गे व इतर पदाधिकारी व सदस्यांनी मेहनत घेतली.यावेळी शाळेच्या विदयार्थ्यांनी महिला दिनाची माहिती ऐकून घेतली.कार्यक्रमाचे संचालन रमेश बामनकर, प्रास्ताविक ऋषी सुखदेवे तर आभार बबलू सडमेक यांनी मांडले.



## चंद्रपूर वनविभागातील वनमजुरांच्या थकीत वेतनाचा मार्ग मोकळा!

# आमदार देवराव भोंगळे यांनी वेधले लक्ष;वनमंत्र्यांनी दिले तातडीने देयके वितरित करण्याचे आदेश

दैनिक वादळ वार्ता
**जिवती । प्रतिनिधी**

चंद्रपूर वनविभागांतर्गत कार्यरत असलेल्या शेकडो कंत्राटी वनमजुरांचा मागील चार महिन्यांपासून रखडलेल्या वेतनाचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. राजुरा विधानसभेचे आमदार देवराव भोंगळे यांनी याप्रश्नी विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात गंभीरतेने दखल घेत सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. त्यांच्या याच प्रयत्नांना यश आले असून राज्याच्या वनमंत्र्यांनी थकीत मजुरी तातडीने वितरित करण्याचे आदेश दिल्याने वनमजुरांना मोठा दिलासा मिळाला आहे.चंद्रपूर वनविभागात संगणक चालक, वाहन चालक, रोपवन मजूर, चौकीदार, बिट मदतनीस आणि वनविश्रामगृह मजूर अशा विविध पदांवर कंत्राटी कर्मचारी अहोरात्र सेवा देत आहेत. मात्र, ऑक्टोबर २०२५ पासून त्यांना मजुरी मिळाली नाही. थकीत वेतनामुळे या कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे. आपल्या हक्काच्या मानधनासाठी या कर्मचाऱ्यांनी १६ फेब्रुवारी २०२६ पासून बेमुदत कामबंद आंदोलन पुकारले आहे. वनसंवर्धन, वन्यजीव संघर्ष निवारण आणि वनसंरक्षण ासारखी महत्त्वाची कामे या आंदोलनामुळे प्रभावित होण्याची शक्यता निर्माण झाली होती. या गंभीर समस्येची दखल घेत आमदार देवराव भोंगळे यांनी थेट शासनाकडे धाव घेतली. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या प्रश्नोत्तराच्या तासात त्यांनी सभागृहात उपप्रश्न उपस्थित करून शासनाचे याकडे लक्ष वेधले.



वनमजुरांवरील आर्थिक संकट आणि वनसंरक्षण व्यवस्थेवर होणारा प्रतिकूल परिणाम त्यांनी प्रभावीपणे मांडला. 'वेतन देयक संनियंत्रण प्रणाली' (Wage Bill Monitoring System) अंतर्गत निधी उपलब्ध नसल्याने ही कोंडी निर्माण झाली होती. आमदार भोंगळे यांनी वन्यजीव उपशमन योजना तसेच अधिवास विकासाच्या २% व ४% निधीतून ६६६.१० लक्ष रुपयांचे अनुदान उपलब्ध करून देण्याची आग्रही मागणी केली.आमदार भोंगळे यांच्या पत्राची आणि सभागृहातील मांडणीची तात्काळ दखल घेत राज्याचे वनमंत्री ना. गणेशजी नाईक यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. कालच या संदर्भात जिल्ह्यातील वनमजुरांची थकीत देयके वितरित करण्याचे स्पष्ट आदेश संबंधित विभागाला देण्यात आल्याचे मंत्र्यांनी सभागृहात जाहीर केले.आमदार देवराव भोंगळे यांच्या या यशस्वी मध्यस्थीमुळे वनमजुरांचे आंदोलन आता मागे घेतले जाण्याची शक्यता असून, विभागाचे कामकाज पुन्हा सुरळीत होणार आहे. सर्वसामान्य कष्टकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिल्याबद्दल वनमजुरांनी आमदार भोंगळे यांचे आभार मानले आहेत.

# कुंडलवाडीत डॉ.हेडगेवार जयंती उत्साहात साजरी



दैनिक वादळ वार्ता
**कुंडलवाडी । प्रतिनिधी**

डॉ. हेडगेवार यांच्या जयंतीनिमित्त हेडगेवार चौक येथे फलकाचे पूजन करून कार्यक्रम उत्साहात पार पडला. कुंडलवाडीच्या कर्तव्यदक्ष नगराध्यक्षा सौ. प्रेरणाताई गजानन कोटलावार* यांच्या हस्ते फलकाचे पूजन करण्यात आले. तसेच नगरपरिषद व विविध कार्यकारी सोसायटीमध्ये सुद्धा डॉ . हेडगेवार यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या प्रसंगी तालुका सरसंघसंचालक विश्वनाथ दाचावार, नगरसेवक तथा गटनेता रमेश ईरलावार, नगरसेवक संजय गोनेलवार, नगरसेवक गंगाधर कोटलावार, प्रदीप खेळगे , अमरनाथ कांबळे, राहुल सबनवार तसेच शहरातील अनेक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामुळे परिसरात देशभक्तीचा आणि एकात्मतेचा संदेश पसरला.

# माणूस विसरला कर्तव्य,पण मेवासी वनविभागाने दिला आरसा! चिमण्यांसाठी घरटी अन् पाण्यासाठी शपथ

सिमेंटच्या या जंगलात,
तिचं घर हरवून गेलं...
काचांच्या त्या भिंतीत,
तिचं अंगण हरवून गेलं!
कुठे शोधू ती जागा,
जिथे मनसोक्त बागडता येईल?
अन कुठे शोधू तो कोपरा,
जिथे सुखाने विसावता येईल?
पण मेवासी वनविभागाने,
ममतेचा हात दिला...
तहानलेल्या त्या जिवांना,
अमृताचा घोट दिला!
आता सजतील नवी घरटी,
अन् घुमतील चिवचिवाट गाणी...
पुन्हा भरेल चिऊचियांच,
मायेच्या ओलाव्यात पाणी!

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी.**

आजचा माणूस कमालीचा असंवेदनशील झाला असून तो निसर्गाप्रती आपली कर्तव्ये विसरला आहे, अशा परखड शब्दांत प्रा. डॉ. संजयकुमार शर्मा यांनी समाजाच्या मानसिकतेवर बोट ठेवले. निमित्त होते, मेवासी वनविभाग, भारतीय जैन संघटना आणि सहयोग सोशल ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'त्रिवेणी' संगम कार्यक्रमाचे. आंतरराष्ट्रीय जल दिन, जागतिक वन दिन आणि चिमणी दिनाचे औचित्य साधून तळोदा येथे निसर्ग संवर्धनाचा जागर करण्यात आला.या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ व्यासपीठावरून मार्गदर्शन न करता, महाविद्यालयीन तरुण-तरुणींना थेट रोपवाटिकेचे प्रशिक्षण देण्यात आले. बीजातून रोप कसे तयार करावे, त्याची लावण कशी करावी आणि त्याचे रक्षण कसे करावे, याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना देण्यात आले. यशस्वी प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र




देऊन गौरविण्यात आले. वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर, ड. अल्पेश जैन यांनी उपस्थित सर्वांना पाण्याची नासाडी थांबवण्याची आणि जलस्रोत सुरक्षित ठेवण्याची सामूहिक शपथ दिली. जलसंवर्धन ही आता चैन नसून जगण्यासाठीची अनिवार्य गरज असल्याचे त्यांनी यावेळी पटवून दिले.वाढत्या सिमेंटच्या जंगलात हरवलेल्या चिमण्यांसाठी याप्रसंगी विशेष उपक्रम राबवण्यात आला. वनविभागाच्या परिसरात ठीकठिकाणी 'बर्ड फिडर' आणि कृत्रिम घरटी लावण्यात आली. विशेष म्हणजे, उपस्थित लहान चिमुकल्यांनाही ही घरटी आणि वॉटर फिडर भेट म्हणून देण्यात आली, जेणेकरून बालवयापासूनच त्यांच्यात निसर्गप्रेम रुजावे.या सोहळ्याला वनपरिक्षेत्र अधिकारी शंतनू सोनवणे, व्ही. आर. गावीत, गिरधर पावरा, प्रा. आर. ओ. मगरे, प्रा. एस. बी. गरुड, अशोक सूर्यवंशी, शरद सूर्यवंशी, चेतन शर्मा, रमेशकुमार भाट, राजाराम राणे यांच्यासह भारतीय जैन संघटनेचे आणि सहयोग सोशल ग्रुपचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमेशकुमार भाट यांनी केले, तर आभार अशोक सूर्यवंशी यांनी मानले.

## भक्ती,सेवा आणि समर्पणाचा भव्य दिव्य सोहळा,कृतज्ञ अभिवादन-भागवत भुषण ह.भ.प.केशव महाराज शास्त्री

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

भगवान श्रीकृष्ण आश्रम, केज येथे पार पडलेल्या भव्य आणि दिव्यधार्मिक सोहळ्याच्या निमित्ताने सर्व भाविक भक्तांचे जाहीर आभार भागवत भुषण ह.भ.प.केशव महाराज शास्त्री यांनी व्यक्त केले आहेत.पुढे बोलताना ते म्हणाले की,
भगवान श्रीकृष्णाच्या कृपेने,महान तपस्वी परम त्यागी श्री १०८ स्वामी चिन्मय पुरी जी महाराज (हिमाचल प्रदेश),तसेच महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध रामायणाचार्य ह.भ.प. रामरावजी महाराज ढोक यांच्या पावन उपस्थितीत
श्रीकृष्ण मंदिर भूमिपूजन १०८ कुंडी महाविष्णूयाग यज्ञ,संगीत रामकथा व अखंड हरिनाम सप्ताह हा नऊ दिवसांचा सोहळा अत्यंत भक्तीमय वातावरणात यशस्वी रित्या पार पडला.या संपूर्ण कार्यक्रमात लाभलेले आपले प्रेम, सहकार्य आणि सेवाभाव हेच आमच्यासाठी खरे बळ ठरले.सर्व जाती-




धर्मातील भक्तभाविकांनी दिलेल्या देणग्या,तसेच महाप्रसाद पंगतीसाठी पुढाकार घेणाऱ्या अन्नदात्यांचे योगदान हे खरोखरच प्रेरणादायी आहे.तसेच,या भव्य सोहळ्याला यशस्वी करण्यासाठी रात्रंदिवस परिश्रम घेणाऱ्या स्वयंसेवकांचे,तसेच पंचक्रोशीतील आश्रमावर प्रेम करणाऱ्या प्रत्येक भक्ताचे मनःपूर्वक कौतुक आणि आभार व्यक्त करतो.आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळेच श्रीकृष्ण मंदिर उभारणी चे हे पवित्र कार्य अधिक भक्कम होत आहे.हीच एकजूट,हा सेवाभाव आणि ही भक्तीभविष्यात ही अशीच कायम राहो, हीच श्रीकृष्ण चरणी प्रार्थना.श्रीकृष्ण आश्रम व भक्त परिवार,केज आपल्या सर्वांच्या सहकार्याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद अशा शब्दात भागवत भुषण ह.भ.प. केशव महाराज शास्त्री व ह.भ.प.विष्णु महाराज राऊत यांनी भाविक भक्तांचे आभार व्यक्त केले आहेत.तसेच प्रसिद्धी माध्यमांनी सर्व माध्यमातून सहकार्य केले याबद्दल सर्व पत्रकार बांधव,संपादक यांचे आभार मानले आहेत.

## नंदुरबारमध्ये 'चेट्रीचंड़' महापर्व उत्साहात संपन्न सिंधी समाजाचा अभूतपूर्व एकता आणि सेवाभाव!

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

भगवान श्री झूलेलाल यांच्या कृपा आशीर्वादाने नंदुरबार शहरातील सिंधी समाजातर्फे 'चेट्रीचंड़' हा महापर्व अत्यंत आनंदी, उत्साही आणि सौहार्दपूर्ण वातावरणात निर्विघ्नपणे संपन्न झाला. या महोत्सवाच्या माध्यमातून सिंधी समाजाने आपल्या सांस्कृतिक वारशाचे दर्शन घडवत शहरात एकतेचा मोठा संदेश दिला आहे. विविध उपक्रमांनी रंगला महोत्सव या महोत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे लहान मुलांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वांचा असलेला सक्रिय सहभाग. साप्ताहभरात विविध सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यात सिंधी संस्कृतीवर आधारित 'मेगा क्विज' आणि 'सिंधी मेलो' सारख्या स्पर्धांनी समाजाचा गौरव वाढवला. 'बी-पोजिटिव्ह ग्रुप' आणि इतर संघटनांच्या वतीने 'आरोग्य तपासणी



शिबिर' तसेच 'महा रक्तदान शिबिराचे' आयोजन करून समाजाप्रती आपले कर्तव्य पार पाडले. लालसांई यांच्या जन्मोत्सवानिमित्त 'केक कटिंग', 'सांई जी सवारी', '१२१ सामूहिक बेहराणा साहेब' आणि भव्य 'शोभायात्रा' काढण्यात आली. श्री समाधी साहेब मंदिर आणि विविध सेवाभावी संस्थांच्या सहकार्याने 'महाप्रसाद (भंडारा)' अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला. या यशस्वी नियोजनामागे झुलेलाल छमाछम भजन मंडली, सिंधी समाज युवा मंच, सिंधी सांस्कृतिक ग्रुप, सिंधी युवा शक्ती, आणि लालसांई ग्रुप यांसारख्या अनेक संघटनांचे मोलाचे सहकार्य लाभले. चेट्रीचंड़ महोत्सवाचा एक भाग म्हणून आता 'जेजेपीएल डे-नाइट क्रिकेट टूर्नामेंट' ला सुरुवात झाली आहे. ग्रीन पार्क ओपन ग्राउंडवर रंगणाऱ्या या सामन्यांचा थरार पुढील पाच दिवस चालणार आहे.या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ आणि महोत्सवाची पूर्णाहुती २५ मार्च २०२६, बुधवार रोजी रात्री ९ वाजता होणार आहे. झुलेलाल सेवा मंडळ, नंदुरबार यांनी सर्व भाविकांचे आणि कार्यकर्त्यांचे आभार मानले असून, सिंधी एकता झिंदाबाद चा नारा देत या महोत्सवाची यशस्वी सांगता केली. आयोलाल - झुलेलाल!

## शेही येथे आगीचं तांडव! एका मजुराचा घाम गाळून उभा केलेला संसार एका रात्रीत राख!

### घर जळालं, स्वप्नं जळाली... आता उघड्या आभाळाखाली जगायचं कसं? - पीडित गावित कुटुंबाचा टाहो; अख्खं गाव. हळहळलं!

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

नवापूर तालुक्यातील शेही गावात मध्यरात्री निसर्गाने असा काही अक्राळविक्राळ घाला घातला की, एका कष्टकरी मजुराच्या आयुष्याची पुंजी काही क्षणांत भस्मसात झाली. ही केवळ घराला लागलेली आग नव्हती, तर एका गरीब कुटुंबाच्या जगण्याच्या आधाराला लागलेली आग होती.
शेही येथील रहिवासी सुरत्या जेठ्या गावित हे मजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. संपूर्ण कुटुंब श्रद्धेपोटी वडफळी येथील आदिमाता यात्रेसाठी गेले होते. गाव यात्रोत्सवात मग्न असताना, इकडे मध्यरात्री २ ते ३ च्या सुमारास



नियतीने आपला खेळ मांडला. सुरत्या गावित यांच्या घराला अचानक भीषण आग लागली. काही समजण्याच्या आतच आगीच्या ज्वाळांनी संपूर्ण घराला विळखा घातला.
या आगीत केवळ भिंती जळाल्या नाहीत, तर त्या भिंतींमागे जपलेली स्वप्नंही जळून खाक झाली. घरात साठवलेलं वर्षभराचं धान्य, अंगावरच्या कपड्यांशिवाय उरलेले इतर कपडे, महत्त्वाची शासकीय कागदपत्रे आणि मुलीच्या लग्नासाठी किंवा संकटासाठी कष्टाने साठवून ठेवलेली ८० हजार रुपयांची रोकड आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. आता या कुटुंबाकडे उरली आहे ती फक्त काळीशार राख आणि डोळ्यांतलं पाणी.
अग्निशमन दलाशी संपर्क होऊ शकला नाही, मात्र अशा कठीण प्रसंगी शेही गावातील ग्रामस्थ, ग्रामपंचायत सदस्य आणि तरुण रक्ताचे युवक देवदूतासारखे धावून आले. स्वतःच्या जिवाची पर्वा न करता त्यांनी आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. त्यांच्या एकजुटीमुळे पुढील अनर्थ टळला, पण गावित कुटुंबाचं झालेलं नुकसान भरून येण्यासारखं नाही.
आज या कुटुंबावर आभाळ फाटलं आहे. एका वेळच्या जेवणाची भ्रांत असलेल्या या मजुराकडे आता हक्काचं छप्परही उरलेलं नाही. प्रशासनाने कागदी घोडे न नाचवता तातडीने पंचनामा करून या कुटुंबाला आधार द्यावा, अशी संतप्त आणि भावनिक मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## नायगांव नगरीचे भूमिपुत्र ओम मेडेवार यांची जर्मनीतील नामांकित कंपनीत मेकानिकल इंजिनिअर म्हणून निवड

दैनिक वादळ वार्ता
**नायगांव । हानुमंत चंदनकर**

नायगाव शहरातील प्रसिद्ध उद्योजक श्री रमेश मेडेवार यांचे सुपुत्र श्री ओम रमेश मेडेवार यांची दिनांक १९ मार्च रोजी जर्मनीतील डूसेल्डॉर्क शहरातील एका नामांकित कंपनीत मेकानिकल इंजिनिअर म्हणून नियुक्ती करण्यात आली ते गेल्या पाच वर्षापासून भारतासह इतर देशात शिक्षण घेतले ओम मेडेवर यांनी जिद्द चिकाटी व कठोर परिश्रम घेऊन हे संपादन केले नायगांव शहरातील प्रसिद्ध उद्योजक तथा किराणा व्यापारी रमेश मेडेवार यांचे ते सुपुत्र होत सावकारनी आपल्या ओमला वेगवेगळ्या स्पर्धात्मक परीक्षा व उच्च शिक्षण देऊन त्यांना घडवलं . ओमला अभ्याससाठी वेळोवेळी मार्गदर्शन करणारे व प्रोत्साहन देणारे श्रीराम शेठ मेडेवार यांच्या संयोगाने हा योग घडवून आला यशाचे श्रेय ओमचे वडील रमेश मेडेवार व आई श्री रेखा मेडेवार यांना तो देतो त्यांच्या नियुक्ती



बद्दल नायगाव शहरासह तालुक्यात अभिनंदन व कौतुक होत आहे ओम मेडेवार म्हणतात की तरूणांनी स्पर्धाला सामोरे गेलं पाहिजे व सतत अभ्यास केला पाहिजे मोबाईल पासून वाईट मित्रा पासून कोसो दूर असलं पाहिजे असा संदेश तो तरुणाला दिला

# पत्रकारांच्या मागण्यांवर शासनाशी सकारात्मक चर्चा वाशीम अधिवेशनातील ठरावांचे मुख्यमंत्री व मंत्र्यांना निवेदन!

## डॉ.विश्वासराव आरोटे यांच्या पुढाकाराने पत्रकारांच्या मागण्यांचा मुद्दा थेट शासन दरबारी!

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे वाशीम येथे नुकतेच २७ वे राज्य अधिवेशन संपन्न झाले होते. या अधिवेशनात पत्रकारांच्या हितासाठी विविध महत्त्वपूर्ण ठराव मंजूर करण्यात आले होते. त्या ठरावांचे सविस्तर निवेदन आज मुंबईतील विधान भवन येथे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच विविध विभागांच्या मंत्र्यांना सादर करण्यात आले.राज्य सरचिटणीस तथा दैनिक 'समर्थ गांवकरी'चे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी मुख्यमंत्री व मंत्रिमंडळातील सदस्यांशी प्रत्यक्ष भेट घेऊन वाशीम अधिवेशनात मंजूर झालेल्या पत्रकारांच्या विविध मागण्यांबाबत सविस्तर चर्चा केली. यामध्ये पत्रकारांची सुरक्षा, मानधनवाढ, आरोग्य व अपघात विमा योजना, शासकीय सवलती तसेच पत्रकारांना भेडसावणाऱ्या विविध अडचणींचा समावेश होता. या सर्व मुद्द्यांवर शासनाने सकारात्मक भूमिका दर्शवली असून लवकरच ठोस निर्णय घेतले जातील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.या भेटीदरम्यान नूतन राज्यसभा खासदार रामराव वडकुते, अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, शिवेंद्रसिंहराजे भोसले, नरहरी झिरवाळ, शिक्षणमंत्री दादा भुसे, माजी मंत्री जितेंद्र आव्हाड, आदिती तटकरे, पंकजा मुंडे यांच्यासह संभाजीनगर शिक्षक मतदारसंघाचे आमदार विक्रम काळे, आमदार हिरामण खोतकर, काशिनाथ दाते, विक्रमसिंह पाचपुते आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांचा 'समर्थ गांवकरी' दिनदर्शिका व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. तसेच ज्येष्ठ पत्रकार वाणी यांच्यासह अनेक पत्रकार प्रतिनिधींनीही या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला.या प्रसंगी संजय फुलसुंदर (महाव्यवस्थापक, दैनिक समर्थ गांवकरी), नयन डुंबरे (मंत्रालय संपर्कप्रमुख) तसेच विष्णू बुरे (मंत्रालय प्रतिनिधी) यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात महत्त्वाची भूमिका बजावली.एकूणच, वाशीम अधिवेशनात मांडण्यात आलेल्या पत्रकारांच्या विविध मागण्यांवर शासन स्तरावर सकारात्मक निर्णय होतील, अशी आशा या भेटीद्वारे व्यक्त करण्यात आली असून पत्रकारांच्या हक्कांसाठी हा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077